# सोलापूर महानगरपालिका

(१)

जा.क्र.मंडई/१३/ ४१
मुख्याधिक्षक मंडई कार्यालय
सोलापूर दि.२३/०७/२०२०

---

मा.

सादर

विषय : मा.शासन परिपत्रकानुसार बकरी ईद - २०२० बाबत दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार वृत्तपत्रातुन जाहिर प्रसिध्दीकरण देणेबाबत.

संदर्भ : शासन परिपत्रक क्रमांक - डीआयएस- ०६२०/प्र.क्र.९१/विशा १ब दि.१७/०७/२०२० चे परिपत्रक.

उपरोक्त विषयांस अनुसरुन दि.०१/०८/२०२० रोजी बकरी ईद सण शहरामध्ये कोव्हीड १९ मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता या वर्षी साध्या पध्दतीने करण्याचा निर्णय मा.शासनाने घेतलेले आहे.

सोलापूर महानगरपालिकेकडून कोरोना विषाणु कोव्हीड १९ प्रादुर्भाव रोखण्या कामी प्रशासकीय पातळीवर विविध प्रकारच्या प्रतिबंधकात्मक उपाययोजना करणेत येत आहे. संदर्भीय मा.शासनाचा परिपत्रकानुसार मंडई विभागाकडुन नागरिकांची होणारी गर्दी विचारत घेता तात्पुरत्या स्वरुपाचे पशुवध गृह उपलब्ध करुन देणेत येणार नाही. याबाबत शहरातील बकरे कटाई परवाना धारक व्यावसायीकांना व तमाम मुस्लीम बांधवांना दै.वृत्तपत्रातुन जाहिर प्रसिध्दीकरणाद्वारे माहितीस्तव कळविणे उचीत होणार आहे असे या कर्यालयाचे मत आहे. तसेच सदर जाहिर प्रसिध्दीकरणामध्ये मा.शासनाने संदर्भीय परिपत्राकामध्ये मा.शासनाच्या हि प्रसिध्दीकरण करण्यात येईल त्याचप्रमाणे सो.म.न.पा चे संकेत स्थळावरुन मा.शासन परिपत्रक प्रसिध्द केले जाईल.

तरी सोबत जोडलेल्या जाहिर प्रसिध्दीकरणाचा मसुदानुसार सदरचे जाहिर प्रसिध्दीकरण शहरातील दोन लोकप्रिय दैनिकामधुन प्रसिध्द करण्यास माननियांची मान्यता मिळणे हि विनंती आहे. तसेच सदरचा कामी येणारा खर्च दौंड्या व जाहिराती या सदरी खर्ची टाकणेस माननीयांची मान्यता मिळणेस विनंती आहे.

मुख्याधिक्षक मंडई
सोलापूर महानगरपालिका

२४/७
सहा.आयुक्त

आयुक्त
२८.७.२०

| | |
|---|---|
| Mainet-No. | — |
| मा.आयुक्त कार्यालय | ३५८ |
| दिनांक- २४/०७/२०२० | |

Scanned with CamScanner

# जाहिर प्रसिध्दीकरण

या जाहिर प्रसिध्दीकरणाद्वारे शहरातील सर्व तमाम मुस्लीम बांधवांना व बकरे कटई परवानाधारक व्यावसायीकांना कळविण्यात येते की मा.शासनाने कोव्हीड - १९ मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य परिस्थितीमुळे विचार करता यावर्षी बकरी ईद साध्या पध्दतीने साजरी करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने सोलापूर महानगरपालिके कडून विहीत मार्गदर्शक सुचना प्रसिध्द करणेत येत असुन त्याचे पालन संबंधिताने कारावे.

१) कोविड १९ मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य परिस्थितीत राज्यात सर्व धार्मिक कार्यक्रमांना बंदी आहे. त्यास अनुसरुन बकरी ईदची नमाज मस्जिद अथवा ईदगाह अथवा सार्वजनिक ठिकाणी अदा न करता, नागरिकांनी आपल्या घरीच अदा करावी.

२) सध्या कार्यान्वित असणारे जनावरांचे बाजार बंद राहतील. नागरिकांना जनावरे खरेदी करावयाची असल्यास त्यांनी ऑनलाईन पध्दतीने अथवा दूरध्वनीवरुन जनावरे खरेदी करावी.

३) नागरिकांनी शक्यतो प्रतिकात्मक कुर्बानी करावी.

४) प्रतिबंधित (Containment) क्षेत्रामधे सध्या लागू करण्यात आलेले निर्बंध कायम राहतील. त्यामध्ये बकरी ईद निमित्त कोणतीही शितीलता देता येणार नाही.

५) बकरी ईदच्या निमित्ताने नागरिकांनी कुठल्याही सार्वजनिक ठिकाणी गर्दी करुन नये किंवा एकत्र जमू नये.

६) कोविड १९ या विष्याणूचा प्रादूर्भाव रोखण्यासठी शासनाचा मदत व पुनर्वसन,आरोग्य,पर्यावरण,वैद्यकीय शिक्षण विभाग तसेच सोलापूर महानगरपालिका,पोलिस स्थानिक प्रशासन यानी विहित केलेल्या नियमांचे अनुपालन करणे बंधनकारक राहील.

७) तसेच या परिपत्रकानंतर व प्रत्यक्ष सण सुरु होण्याच्या मधल्या कालावधित अजून काही सूचना प्रसिध्द झाल्यास त्यांचे देखील अनुपालन करावे.

८) वरिल सर्व मा.शासन परिपत्रकातील मार्गदर्शक सुचनेनुसार व कोविड १९ मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य परिस्थिती मुळे या वर्षी सोलापूर महानगरपालिके कडून तात्पुरते स्वरुपातील पशुवधगृह उभारले जाणार नाही याची सर्व संबंधितानी नोंद घ्यावी.

वरिलप्रमाणे मा.शासन मार्गदर्शक सुचनाप्रमाणे सर्व संबंधितानी पालन करुन कोविड १९ या संसर्गजन्य रोगाचा फैलाव रोखणे कामी सहकार्य करण्याचे आव्हान करणेत येत आहे.

आयुक्त
सोलापूर महानगरपालिका

२४.७

बकरी ईद-२०२० बाबत
मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग.
शासन परिपत्रक क्रमांक- डीआयएस- ०६२०/प्र.क्र.९१/विशा १ ब
दुसरा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई.
दिनांक- १७ जुलै, २०२०.

परिपत्रक

कोविड-१९ मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता या वर्षी बकरी ईद साध्या पध्दतीने साजरी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना विहित करण्यात येत आहेत.

१. कोविड-१९ मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य परिस्थितीमुळे राज्यात सर्व धार्मिक कार्यक्रमांना बंदी आहे. त्यास अनुसरुन बकरी ईदची नमाज मस्जिद अथवा ईदगाह अथवा सार्वजनिक ठिकाणी अदा न करता, नागरिकांनी आपल्या घरीच अदा करावी.
२. सध्या कार्यान्वीत असणारे जनावरांचे बाजार बंद राहतील. नागरिकांना जनावरे खरेदी करावयाची असल्यास त्यांनी ऑनलाईन पध्दतीने अथवा दूरध्वनीवरुन जनावरे खरेदी करावी.
३. नागरिकांनी शक्यतो प्रतिकात्मक कुर्बानी करावी.
४. प्रतिबंधित (Containment) क्षेत्रामध्ये सध्या लागू करण्यात आलेले निर्बंध कायम राहतील. त्यामध्ये बकरी ईद निमित्त कोणतीही शिथीलता देता येणार नाही.
५. बकरी ईदच्या निमित्ताने नागरिकांनी कुठल्याही सार्वजनिक ठिकाणी गर्दी करु नये किंवा एकत्र जमू नये.
६. कोविड- १९ या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाच्या मदत व पुनर्वसन, आरोग्य, पर्यावरण, वैद्यकीय शिक्षण विभाग तसेच संबंधित महापालिका, पोलीस, स्थानिक प्रशासन यांनी विहित केलेल्या नियमांचे अनुपालन करणे बंधनकारक राहील. तसेच या परिपत्रकानंतर व प्रत्यक्ष सण सुरु होण्याच्या मधल्या कालावधीत अजून काही सूचना प्रसिध्द झाल्यास त्यांचे देखील अनुपालन करावे.

Scanned with CamScanner

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२००७१७१७११४६७२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Amitabh Gupta

(अमिताभ गुप्ता)
प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग.

**प्रत माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित,**

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री, महाराष्ट्र शासन
४. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. सचिव व महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई.
८. सर्व विभागीय आयुक्त.
९. सर्व आयुक्त, महानगरपालिका.
१०. सर्व पोलीस आयुक्त.
११. आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२. सर्व जिल्हाधिकारी.
१३. सर्व पोलीस अधीक्षक.



Scanned with CamScanner

# बकरी ईद साधेपणाने साजरी करावी!
# शासनाच्या मार्गदर्शक सूचना

- कोविड-१९ मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य परिस्थितीत राज्यात सर्व धार्मिक कार्यक्रमांना बंदी आहे. त्यास अनुसरुन बकरी ईदची नमाज मस्जिद अथवा ईदगाह अथवा सार्वजनिक ठिकाणी अदा न करता, नागरिकांनी आपल्या घरीच अदा करावी.

- सध्या कार्यान्वित असणारे जनावरांचे बाजार बंद राहतील. नागरिकांना जनावरे खरेदी करावयाची असल्यास त्यांनी ऑनलाईन पध्दतीने अथवा दूरध्वनीवरुन जनावरे खरेदी करावी.

- नागरिकांनी शक्यतो प्रतिकात्मक कुर्बानी करावी.

- प्रतिबंधित (Containment) क्षेत्रामध्ये सध्या लागू करण्यात आलेले निर्बंध कायम राहतील. त्यामध्ये बकरी ईद निमित्त कोणतीही शिथीलता देता येणार नाही.

- बकरी ईदच्या निमित्ताने नागरिकांनी कुठल्याही सार्वजनिक ठिकाणी गर्दी करु नये किंवा एकत्र जमू नये.



- कोविड-१९ या विषाणूचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी शासनाच्या मदत व पुनर्वसन, आरोग्य, पर्यावरण, वैद्यकीय शिक्षण विभाग तसेच संबंधित महापालिका, पोलीस, स्थानिक प्रशासन यांनी विहीत केलेल्या नियमांचे अनुपालन करणे बंधनकारक राहील.

- तसेच या परिपत्रकानंतर व प्रत्यक्ष सण सुरु होण्याच्या मधल्या कालावधीत अजून काही सूचना प्रसिध्द झाल्यास त्यांचे देखील अनुपालन करावे.

Scanned with CamScanner